तरुण भारत
Akola Main | 2025-07-27 | Page- 11
epaper.tarunbharat.net

# भाऊसाहेब लहाने महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात

◆ **पिंजर, २६ जुलै**

येथील भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस कॉलेजमध्ये बीए भाग १ ला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि विद्यापीठ गीताने झाली.

प्रसंगी स्वागताध्यक्ष डॉ. व्ही. सी. खारोडे यांनी स्वागतपर भाषणातून विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत केले. उच्च शिक्षणात जीवन घडविण्याची क्षमता आहे. तिचा वापर करून जीवन सार्थकी लावावे, असे आवाहन केले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे बोलत होते. त्यांच्यासोबत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. मनोज फडणीस, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ पंकज तायडे मंचावर होते. दुपारच्या सत्रामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाल्यामुळे पदवी स्तरावर होणारे आमुलाग्र बदल विद्यार्थ्यांना सहज लक्षात आणून देण्याचा प्रयत्न डॉ पंकज तायडे यांनी आपल्या सादरीकरणातून केला.

सदर कार्यक्रम अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. पंकज तायडे यांच्या समन्वयातून आयोजित करण्यात आला होता.



दीक्षारंभ कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मान्यवर

आयोजनाचे ३० तासांमध्ये विभाजन करण्यात आले होते. दररोज पाच तास याप्रमाणे सहा दिवसांपर्यंत हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना महाविद्यालय परिसर तथा विविध विभागांचा परिचय करून देणे तसेच देशात राबविल्या जाणाऱ्या उच्च शिक्षण व्यवस्था त्याचे विविध स्तर जसे विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ आणि महाविद्यालय या विविध स्तरांवर शिक्षणाच्या आदानप्रदानाची व्यवस्था कशी कार्य करते याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करणे हा प्रमुख उद्देश या कार्यक्रमाचा होता. दररोज दोन सत्रात विविध विभागांचे सादरीकरण आयोजित केले होते. महाविद्यालयातील विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाची वैशिष्ट्ये, आपल्या अभ्यासक्रमांचे उद्देश तसेच अभ्यासक्रम सादरीकरणाची कोणती पद्धती अस्तित्वात असेल आणि अंतर्गत मूल्यमापनाचा कार्यक्रम कशा प्रमाणे राबविला जाईल त्याबाबतचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभागांविषयी परिचय करून देण्यात आला.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन डॉ. वासुदेव भगत यांनी केले आणि तांत्रिक सहाय विनोद सुर्वे यांनी केले. तर डॉ अशोक वाहुरवाघ, डॉ. रामकृष्ण गावंडे, डॉ. रेखा काळबांडे, प्रा. सुनील मनवर, डॉ नानासाहेब सपकाळ यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

◀*(तभा वृत्तसेवा)*